**ठळक बातम्या**

- राज्यातल्या पहिल्या स्मार्ट आणि इंटेलिजंट गाव प्रयोगाचा नागपूरमधल्या सातनवरी इथं मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत प्रारंभ
- अखिल भारतीय विधिमंडळ पीठासीन अधिकाऱ्यांच्या दोन दिवसीय परिषदेचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या उपस्थितीत उद्घाटन
- गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कोकण रेल्वेच्या 'कार ऑन ट्रेन' सुविधेला सुरुवात
- एकात्मिक हवाई संरक्षण शस्त्रप्रणालीची पहिली उड्डाण चाचणी यशस्वी

**आणि**

- क्रिकेटपटू चेतेश्वर पुजारा याची आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती

**<><><><><>**

महाराष्ट्रातलं पहिलं स्मार्ट आणि इंटेलिजंट गाव असलेल्या नागपूर जिल्ह्यातल्या सातनवरी गावाचा यशस्वी प्रयोग बघून या योजनेच्या पहिल्या टप्प्यात प्रत्येक तालुक्यातली १० गावं स्मार्ट आणि इंटेलिजंट करायचा निर्णय सरकारनं घेतला आहे, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज नागपूरमध्ये केली. सातनवरी या गावातून स्मार्ट आणि इंटेलिजंट व्हिलेज योजनेचा प्रारंभ त्यांच्या हस्ते झाला, त्यावेळी ते बोलत होते. या योजनेअंतर्गत कृषी, आरोग्य, शिक्षण अशा १८ वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे संपूर्ण सातनवरी गावाचं परिवर्तन होईल, असा विश्वास त्यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला.

**<><><><><>**

स्वातंत्र्यप्राप्तीप्रमाणेच देशाची लोकशाही अबाधित ठेवणं हेही महत्वाचं असून विठ्ठलभाई पटेल यांनी भारतीय संकल्पनांवर आधारित लोकशाहीचा पाया

घालण्याचं काम केलं, अस केंद्रीय गृहमंती अमित शाह यांनी म्हटलं आहे. त्यांनी आज नवी दिल्लीत अखिल भारतीय विधिमंडळ पीठासीन अधिकाऱ्यांच्या दोन दिवसीय परिषदेचं उदघाटन केलं, त्यावेळी ते बोलत होते. देशाच्या संसदेची आणि पीठासीन अधिकाऱ्यांची प्रतिष्ठा राखणं महत्वाचं असून विधिमंडळं ही जनतेचा आवाज पोहोचवण्याचं माध्यम बनायला हवी, असं ते म्हणाले….

**होल्ड बाईट शहा**

देशाच्या केंद्रीय कायदेमंडळाचे पहिले अध्यक्ष म्हणून विठ्ठलभाई पटेल यांनी पदभार स्वीकारल्याच्या घटनेला १०० वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्तानं ही परिषद दिल्ली विधानसभेत आयोजित केली आहे. देशभरातल्या २९ राज्यं विधानसभांचे अध्यक्ष आणि ६ राज्यांच्या विधानपरिषदेचे सभापती तसेच उपसभापती या परिषदेत सहभागी होणार आहेत. यावेळी शाह यांनी विठ्ठलभाई पटेल यांचे जीवन, संसदीय योगदान आणि देशाच्या संसदीय इतिहासावर आधारित प्रदर्शन तसंच माहितीपटाचं उदघाटन केलं. विठ्ठलभाई पटेल यांच्यावर काढलेल्या विशेष टपाल तिकीटाचं अनावरण शहा यांनी यावेळी केलं.

**<><><><>**

गगनयान या पहिल्यावहिल्या मानवसहित अंतराळ मोहिमेसाठी भारत पूर्ण तयार असून ही फक्त तंत्रज्ञानातली प्रगती नाही, तर आत्मनिर्भर भारताच्या प्रवासातला एक नवा अध्याय आहे, असा विश्वास संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी आज व्यक्त केला. मोहिमेसाठी निवड झालेले ग्रुप कॅप्टन्स शुभांशू शुक्ला, प्रशांत बालकृष्णन नायर, अजित कृष्णन आणि अंगद प्रताप या चार अंतराळवीरांचा आज नवी दिल्लीत एका विशेष कार्यक्रमात सत्कार झाला, त्यावेळी ते बोलत होते. अंतराळ क्षेत्रातलं भारताचं योगदान फक्त उपग्रह सोडण्यापुरतं मर्यादित नसून चंद्रापासून ते मंगळापर्यंत भारताचं पाऊल पडत आहे, असं सिंह यांनी नमूद केलं.

**<><><><>**

शेती क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचं नवं पर्व सुरू झालं असून शेतकऱ्यांनी या तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर भर द्यावा, तसंच विषमुक्त सेंद्रिय शेतीकडं वळावं, असं आवाहन उपमुख्यमंत्री पवार यांनी केलं आहे. पुण्यात आयोजित महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागाईतदार संघाच्या पासष्ठाव्या वार्षिक अधिवेशनात ते बोलत होते. राज्यात द्राक्ष उत्पादन वाढावं यासाठी द्राक्ष बागाईतदार संघाच्या माध्यमातून करण्यात येणारं कार्य उल्ले्खनीय असल्याचं त्यांनी सांगितलं.

राज्यातले शेतकरी केंद्रबिंदू मानून सरकार काम करत आहे, असं कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यावेळी म्हणाले. द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांची उत्पन्नाची पातळी वाढविण्यासाठी सरकारच्या माध्यमातून विविध योजना राबवण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

**<><><><><>**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कोकण रेल्वेने 'कार ऑन ट्रेन' अर्थात आपल्या गाडीसह कोकणात येण्याची सुविधा उपलब्ध करून दिली असून त्याची सुरुवात कालपासून झाली. काल दुपारी साडे तीन वाजता कोलाड स्थानकावरून निघालेली कोकण रेल्वेची पहिली कार ऑन ट्रेन रात्री अकरा वाजता सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या नांदगाव रेल्वे स्थानकावर पोहोचली. नांदगाव आणि गोव्यात वेर्णे या दोन स्थानकावर ही सुविधा उपलब्ध असणार आहे.

**<><><><><>**

भारतीय स्टेट बँकेनं रिलायन्स कम्युनिकेशनची खाती बनावट म्हणून घोषित केल्यानंतर आता बँक ऑफ इंडियानेही या कंपनीची कर्ज खाती बनावट म्हणून घोषित केली आहेत. या कंपनीनं कर्जाची रक्कम वळवणं आणि नियमांचं उल्लंघन केल्याचे आरोप बँकेनं केले आहेत.

**<><><><><>**

डीआरडीओ अर्थात संरक्षण संशोधन आणि विकास संघटनेनं काल दुपारी साडेबारा वाजता ओदिशा किनाऱ्याजवळ आय ए डी डब्लू एस अर्थात एकात्मिक हवाई संरक्षण शस्त्रप्रणालीची पहिली यशस्वी उड्डाण चाचणी केली. या बहुस्तरीय स्वदेशी शस्त्र प्रणालीमध्ये जमिनीतून आकाशात मारा करणारी क्षेपणास्त्र प्रणाली, कमी पल्ल्याची प्रगत हवाईसंरक्षण क्षेपणास्त्र प्रणाली आणि लेसर-आधारित निर्देशित ऊर्जा शस्त्र यांचा समावेश आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी आय ए डी डब्लू एस च्या यशस्वी चाचणी बद्दल डी आर डी ओ, सशस्त्र दलं तसंच उद्योग क्षेत्राचं अभिनंदन केलं.

या चाचणीमुळं देशाची हवाई संरक्षण क्षमता आता अधिक बळकट झाली असून, महत्त्वाच्या स्थळांच्या सुरक्षेसाठी शत्रूच्या हवाईहल्ल्यांवर मात करण्याची आपली संरक्षणसिद्धता अधिक विकसित होईल, असं राजनाथ सिंह म्हणाले. संरक्षण संशोधन आणि विकास विभागाचे सचिव आणि डीआरडीओचे अध्यक्ष डॉ. समीर व्ही. कामत यांनी या यशस्वी उड्डाण चाचणीत सहभागी सर्व पथकांचं अभिनंदन केलं.

**<><><><><>**

भारतीय क्रिकेट संघातील फलंदाज चेतेश्वर पुजारा याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या सर्व प्रकारातून निवृत्ती जाहीर केली आहे. क्रिकेटने मला अमूल्य संधी, अनुभव, ध्येय आणि प्रेम दिलं तसंच माझ्या राज्य आणि देशाचं प्रतिनिधित्व करण्याची संधी दिली अशा शब्दात पुजाराने समाजमाध्यमावर आपल्या भावना व्यक्त केल्या. प्रत्येक चांगल्या गोष्टीला शेवट असतो, निवृत्त होताना माझ्या मनात कृतज्ञतेची भावना आहे, असं पुजारा म्हणाला.

चेतेश्वर पुजाराने १०३ कसोटी क्रिकेट सामन्यात ४३ पूर्णांक ६० च्या सरासरीने ७ हजार १९५ धावा केल्या. यात १९ शतकं आणि ३५ अर्धशतकांचा समावेश आहे. कसोटी क्रिकेटमधे सर्वाधिक धावा करणारा पुजारा हा भारतीय

संघातला आठवा खेळाडू आहे. २०१० मधे ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या सामन्यात पुजारानं कसोटी पदार्पण केलं होतं, पहिल्याच सामन्यात त्याने ७२ धावांची उत्कृष्ट खेळी केली होती.

**<><><><><>**

मराठवाडा साहित्य परिषदेच्या ग्रंथ पुरस्कारांचं वितरण आज माजी विभागीय आयुक्त डॉक्टर पुरुषोत्तम भापकर यांच्या हस्ते होणार आहे. यात नरहर कुरूंदकर वाङ्मय पुरस्कार 'अनोखे थायलंड' प्रवास वर्णनासाठी वंदना पारगावकर यांना, म. भि. चिटणीस वाङ्मय पुरस्कार- 'गांधी : वाद आणि वास्तव' या पुस्तकासाठी सचिन कुसनाळे यांना, बी. रघुनाथ वाङ्मय पुरस्कार- पांडुरंग मुरारी यांच्या 'नांगरमुठी' या साहित्यकृतीला तर पुस्तक व्यवहारातील लक्षणीय कामगिरीसाठी रा. ज. देशमुख स्मृती पुरस्कार छत्रपती संभाजीनगरच्या कैलाश पब्लिकेशन्सला प्रदान केला जाईल.

**<><><><><>**

गोंदिया शहरात आज काळ्या, पिवळ्या आणि केशरी रंगांच्या मारबतीची मिरवणूक काढण्यात आली. शहरातल्या अनेक भागातून मोठ्या उत्साहात ही मिरवणूक निघाली. अनेक ठिकाणी देखावे उभारण्यात आले होते. मिरवणूकीत युवक मोठ्या संख्येनं सहभागी झाले होते. मारबती बघण्यासाठी लोकांनी ठिकठिकाणी मोठी गर्दी देखील केली होती.

**<><><><><>**

मुंबई-गोवा महामार्गावर रत्नागिरी जिल्ह्यातल्या खेड तालुक्यातल्या कशेडी बोगद्याजवळ काल मध्यरात्री एका खासगी बसला आग लागली. या दुर्घटनेत जीवितहानी झाल्याचं वृत नाही. अपघाताचं नेमकं कारण अद्याप स्पष्ट झालं नाही. ही बस मुंबईहून मालवणला जात होती. आगीचं वृत्त कळताच खेड नगरपालिकेच्या

अग्निशमन दलानं  घटनास्थळी जाऊन आग आटोक्यात आणली. या अपघातात संपूर्ण बस आणि प्रवाशांचं सामान जळून खाक झालं आहे.

**<><><><><>**

पुढल्या अठ्ठेचाळीस तासांत कोकणात बहुतांश ठिकाणी, मध्य महाराष्ट्रात आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी, तर विदर्भात बऱ्याच ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता तर किनारपट्टी भागात सोसाट्याचा वारा वाहील, असा अंदाज पुणे वेधशाळेने वर्तवला आहे. मराठवाड्यात परभणी, हिंगोली, नांदेड जिल्ह्यांसाठी आज यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. छत्रपती संभाजीनगर, जालना आणि धाराशिव जिल्ह्यांत पुढील दोन दिवस हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडेल, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

**//<><><><><>//**